# ग्रंथसमीक्षा

**The Buddha and Karl Marx**—by D. R. Jatava 1968. Phonix Publishing House, Jagdishpura, Lohamandi, Agra—2. O.P. ( India )

ग्रंथाच्या प्रस्तावनेत कार्ल मार्क्सला बुद्ध उत्तर देऊ शकेल का या डॉ. आंबेडकरांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचा उल्लेख करून विसाव्या शतकात हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे असे लेखकाने सुचविले आहे. याबाबतीत डॉ. आंबेडकर व भिक्खु अनंगरिक सुगतानंद या दोघांच्या मताचा निर्देश करून लेखक स्वतःचे मत मांडतो. त्याच्या मताप्रमाणे बौद्ध तत्त्वज्ञान गतिशील सद्वादाची ( dynamic realism ची ) प्रणाली आहे व केवळ आधिभौतिक प्रणाली नाही. यामुळे मार्क्सवाद व बुद्धप्रणीत तत्त्वज्ञान हे खूपच जवळ येतात. डॉ. आंबेडकरांनी सुचविल्याप्रमाणे पद्धतीच्या बाबतीत फरक असला तरी दोन्ही प्रणाली एकमेकांना पूरक आहेत असे श्री. जाटव यांना वाटते. याचप्रमाणे 'बौद्धधर्म' या संज्ञेने आपल्याला एक तोलामोलाचा धर्म अभिप्रेत नसून या या धर्मामागील तात्त्विक विचार किंवा तत्त्वज्ञान अभिप्रेत आहे अशी त्यांची भूमिका आहे.

लेखकाच्या मते बुद्ध व मार्क्स दोघांनी मानवतावादी ध्येयांचा पाठपुरावा केला आहे. दोघांनाही दुःख व पिळवणूक सामाजिक दुरिते ( evils ) आहेत असे वाटते. सध्याच्या भौतिक प्रगतीच्या मागे धावणाऱ्या जगात मानवतेचा पुरस्कार होणे आवश्यक आहे. यामुळेच 'मार्क्स व बुद्ध यांचे विचार प्रेरणादायी ठरतील व समतेवर आधारलेला आदर्श समाज अस्तित्वात येईल.' अशी आशा लेखकाने प्रगट केली आहे.

---

परामर्श खंड ७, अंक ४, फेब्रुवारी १९८६.

वरील विचाराबाबत कोणाचेच दुमत होणार नाही. परंतु हे सारे स्पष्ट करण्यासाठी केलेले प्रयत्न अव्यापारेषु व्यापार ठरतील असे आहेत. याचे कारण म्हणजे मार्क्स व बुद्ध या दोघांच्या विचारामागील ज्या तात्त्विक भूमिका व मूलभूत संकल्पना आहेत त्यांची चर्चा येथे केलेली दिसत नाही. या ग्रंथात एकूण पंधरा अध्याय आहेत. या अध्यायांच्या मांडणीमागे कोणतीही कारणमीमांसा दिसत नाही. यामुळेच एकामागाहून एक येणाऱ्या अध्यायांत सुसूत्रता दिसत नाही. प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे बौद्ध तत्त्वज्ञान व मार्क्सप्रणीत तत्त्वज्ञान यांची तुलना करणे हा या ग्रंथाचा हेतू आहे हे गृहीत धरले तर ही तुलना कोणत्या तात्त्विक दृष्टिकोणातून केली आहे हे स्पष्ट होणे आव–श्यक होते किंवा हा दृष्टिकोन वेगवेगळ्या अध्यायांतून साकार व्हायला हवा होता. हे न घडल्याने एका बाजूला मार्क्सवादातील काही संकल्पना, दुसऱ्या बाजूला बौद्ध तत्त्वज्ञानातील काही संकल्पना यांची वरवरची चर्चा झालेली दिसते. शिवाय या दोन्ही प्रणाल्यांमध्ये एकास–एक असा संबंध आहे हे जण गृहीत धरलेले दिसते. वर्गकलह, परात्मभाव यासारख्या काही संकल्पना घेऊन त्या बुद्धविचारातही आहेत या दाव्यामागे कोणतीतरी तात्त्विक बैठक किंवा तात्त्विक समर्थन असले पाहिजे. प्रस्तुत ग्रंथात तात्त्विक चर्चेपेक्षा अभिनिवेश दिसतो. ' यामुळेच बुद्धाला खाजगी मालमत्ता संपूर्णपणे नाहीशी करणे जमले नाही मार्क्सला मात्र योग्य संधी मिळाली. ' ( पृष्ठ १४२ ) हे विधान किंवा ' सध्याच्या जगात मानवतावादी विचारप्रणालीचा विजय होईल' हे पृष्ठ २३० वरील विधान यासारखी विधाने पुरेसा आधार न दिल्याने प्रचारकी वाटतात.

कित्येक ठिकाणी बुद्ध व मार्क्स यांचे तत्त्वज्ञान व या तत्त्वज्ञानाचा इतिहास यात गल्लत केलेली दिसते. यामुळे मार्क्सचा ख्रिश्चन धर्माला असलेला विरोध व बुद्धाचा हिंदु धर्माला असलेला विरोध हा सारख्याच प्रकारचा आहे असे लेखकाला वाटते. वास्तविक पाहाता बुद्धाचा हिंदू धर्माला असलेला विरोध हिंदु जीवनपद्धतीला आहे. हिंदु धर्म किंवा बुद्धप्रणीत धम्म पाश्चिमात्य संस्कृतीत मान्यता पावलेला ( religion ) नाही हे समजून घेणे अगत्याचे आहे.

याचप्रमाणे बुद्धाला जाति–वर्ण मान्य नव्हते व वर्गविहीन समाजाची अपेक्षा होती हे खरे आहे. पण अशा समाजरचनेमागे कोणती मूलभूत तत्त्वे किंवा तात्त्विक प्रणाली असली पाहिजे याचा उहापोह लेखक करीत नाही.

सध्याच्या काळात मार्क्स व बुद्ध यांच्या विचारांची तुलना वेगवेगळ्या संदर्भात केली जाते. ही तुलना कशा प्रकारे झाल्यास फलदायी ठरेल याचा

विचार होणे आवश्यक आहे. ही तुलना मार्क्स व बुद्ध या दोघांच्या सखोल अभ्यासावर आधारलेली असली पाहिजे. एरव्ही सखोल अभ्यासाविना केलेली कोणतीही तुलना अतिशय वरवरची ठरते. ही तुलना पूर्वग्रहदूषित अशा दृष्टि-कोनातून केली नसावी. नाहीतर जे जे मार्क्सच्या विचारात आहे ते ते बुद्धाच्या विचारातही आहे किंवा याउलट असे ठासून सांगितले जाते. तात्त्विकदृष्टया यातून काहीही साधले जात नाही. तात्त्विक पातळीवर मार्क्सचे व बुद्धाचे अनेक विचार समान असण्याची शक्यता आहे. परंतु त्यांच्यातील भेदांची चर्चाही झाली पाहिजे. तसेच ज्या परिस्थितीत एखादे तत्त्वज्ञान निर्माण होते त्या परिस्थितीचा परिणाम त्या त्या तत्त्वज्ञानावर होत असतो. राहूल सांकृत्यायन, प्रा. देवीप्रसाद चट्टोपाध्याय इत्यादि विचारवंतांनी केलेल्या लेखनावरून अशी चर्चा किती उद्‌बोधक होऊ शकते याचा बोध होतो.

वरील निकष प्रस्तुत ग्रंथाला लावल्यास ग्रंथाचे शीर्षक आकर्षक असूनही वाचकाची निराशा होण्याची शक्यता आहे असे खेदाने म्हणावे लागेल.

मीना केळकर

तत्त्वज्ञान विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे

१. **बुद्धविचार : मार्क्सवादी दृष्टिक्षेप;** प्रकाशक आर. जी. देसाई, लोकवाङ्मयगृह, मुंबई, द्वितीयावृत्ती (१९८३)

२. **बौद्धदर्शन और मार्क्सवाद :** बौद्धदर्शनविभाग, संपूर्णानंद संस्कृत विश्व विद्यालय, वाराणसी, प्रथमावृत्ती (१९८५)

*

माझ्यासमोर बुद्धविचार : मार्क्सवादी दृष्टिक्षेप हे मराठी, तर बौद्धदर्शन और मार्क्सवाद हे हिंदी अशी दोन निबंधसंकलनात्मक पुस्तके आहेत. यापैकी बुद्धविचार : मार्क्सवादी दृष्टिक्षेप हे लोकवाङ्मय गृहाने प्रथम १९७३ साली प्रसिद्ध केलेले पुस्तक आहे. पुस्तकाच्या नावावरूनच हे सूचित होते की यात संकलित केलेले लेख हे मार्क्सवादी दृष्टिकोनातून बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचे परीक्षण करणारे आहेत. म्हणजे यातील लेखकांनी मार्क्सवाद स्वीकारला आहे, व मार्क्स व बुद्ध यांची तुलना करतानाही त्यांचा दृष्टिकोन मार्क्सवादी किंवा मार्क्स-वादाला वरचढ चढविणारा आहे. दुसरे (हिंदी) पुस्तक संपूर्णानंद संस्कृत विभागाने अलिकडेच म्हणजे १९८५ मध्ये प्रसिद्ध केले आहे. यातही मार्क्स व बुद्ध यांची तुलना करण्याचाच दृष्टिकोन असला, तरी त्यातील बहुसंख्य लेखांचा एकूण कल हा बुद्धाचे समर्थन करण्याचा दिसतो. अर्थात याचा अर्थ यातील सर्व लेखांचा एकूण कल मार्क्सविरोधी आहे असा मात्र नाही. या या पुस्तकात राहुल सांकृत्यायन, प्रा. जगन्नाथ उपाध्याय, डॉ. रामचंद्र पांडचे, भिक्षु जगदीश काश्यप अशा काही मान्यवरांचे लेख तर आहेतच. पण डॉ. आंबेड-करांचे Buddha and Karl Marx हे काटमांडू येथे त्यांनी १९५६ मध्ये दिलेले भाषणही समाविष्ट करण्यात आलेले आहे. यातील काही लेख इंग्रजी आहेत व राहुल सांकृत्यायनांचा एक संस्कृत लेखही आहे. या दुसऱ्या संकल-नाची रचना यामुळे बरीच विस्कळीत झाली असून त्याचे व्यवस्थित संपादन केल्याचेही जाणवत नाही. उदा. सांकृत्यायनांचा संस्कृत लेख आणि त्याचेच हिंदी भाषांतर प्रसिद्ध करण्याची काहीच गरज नव्हती. या दोन्ही पुस्तकांतील

लेखांतून व्यक्त झालेल्या काही विचारांचा येथे थोडक्यात आढावा घ्यायचा आहे.

यातील बहुतेक लेखांमधील भूमिका मार्क्स व बुद्ध यांच्यापैकी कोणाची तरी भूमिका प्रमाण मानून पुढे जाणारी आहे; तर काही वेळा ही भूमिका समन्वयवादी झालेली दिसते. समन्वयाचा एक अविष्कार असा की मार्क्सवाद व बौद्धविचार यांच्यातील आर्थिक व सामाजिक साम्यवाद, अहिंसा, शांती, अनित्यतावाद, आत्मवाद, अनीश्वरवाद, कारणसामग्रीवाद, वस्तुवाद, लोकतंत्र इत्यादी विचारांत साम्य असले आणि बुद्धाने जरी त्याकाळात नैतिक, सामाजिक आर्थिक, तात्त्विक क्षेत्रांमध्ये वैचारिक भर टाकण्याचा प्रयत्न केला असला तरी चालू युगातील समस्या सोडविण्यासाठी, आर्थिक व सामाजिक समता निर्माण होण्याकरीता मार्क्सची प्रणाली स्वीकारणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते आहेत भदन्त आनंद कौशल्यायन, पं. राहुल सांकृत्यायन, वाय. बलराममूर्ती इत्यादी.

पं. जगन्नाथ उपाध्यायही मार्क्सवाद व बौद्धदर्शन यांच्यामध्ये समन्वय व्हायला हवा असे सुचवितात. कारण मार्क्स व बुद्ध यांचे विचार परस्परपूरक आहेत. त्यांच्या मते मार्क्सने सामाजिक, आर्थिक विश्लेषण करून वर्ग, शोषण व राज्यविषयक जे निष्कर्ष काढलेले आहेत त्यांना दिशा देण्याचे कार्य बुद्धाचा 'मध्यममार्ग' हा सिद्धान्त करू शकेल व तो मार्क्सवाद्यांनी सुचविलेल्या मार्गापेक्षा जास्त सफल ठरेल. परंतु उपाध्याय समन्वयाची फक्त दिशाच दर्शवितात. त्यातून सध्याच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत मध्यममार्ग कसा व्यवहारात आणता येईल असा एक गंभीर प्रश्न उत्पन्न होतो. जगन्नाथ उपाध्यायांनी या प्रश्नाला मात्र स्पर्श केलेला नाही.

देवीप्रसाद चट्टोपाध्याय हे भारताच्या इतिहासाचा ऐतिहासिक भौतिकवादी पद्धतीने अन्वयार्थ लावू पहाणारे एक प्रसिद्ध विचारवंत आहेत. त्यांच्या मते बुद्धकालीन सामाजिक परिस्थतीचा आढावा घेतला तर असे दिसते की वर्गविहीन समाजाची स्थापना करणे हे बुद्धाचे ध्येय होते आणि वर्गविहीन समाज ( टोळीसमाज ) हेच बुद्धाचे स्फूर्तिस्थान होते. त्यामुळे बौद्ध तत्त्वज्ञानात ( उदा. चार आर्यसत्ये, अनीश्वरवाद वगैरे ) साम्यवादी विचार दिसले तर आश्चर्य ते काय ? याप्रमाणे चट्टोपाध्याय बुद्धाचे विचार, तत्त्वज्ञान हे बुद्धाची स्वतंत्र, वेगळी निर्मिती होती आहे हे मान्य न करता त्याच्या विचारांना इति–

ह्रासाच्या मार्क्सवादी आकलनाच्या चौकटीत बसविण्याचा प्रयत्न करतात. याच्या काहीसा उलटा प्रयत्न डॉ. आंबेडकरांचा दिसतो. ते असे म्हणतात की मार्क्सने शोषणविषयक, खाजगीमालमत्तेबद्दल जे विचार मांडलेले आहेत ते गौतम बुद्धाच्या तत्त्वज्ञानात आढळतातच. एवढेच नाहीतर शोषण, दुःख, इत्यादींपासून मुक्ती मिळविण्यासाठी मार्क्स जे उपाय योजतो त्यापेक्षा बुद्धाचा मार्ग अधिक योग्य व सुरक्षित आहे. त्यामुळे बुद्धाचा मार्गच स्वीकारायला हवा.

बुद्धधर्म व मार्क्सवाद यांची तुलनाच होऊ शकत नाही कारण त्या दोहोंत तेवढे साम्यच नाही असाही विचार काही लेखांतून मांडला गेलेला दिसतो. रामविलास शर्मा व गोविंदचंद पांडचे यांचे लेख अशा प्रकारचे आहेत. पैकी रामविलास शर्मांची मार्क्सवादाशी जवळीक आहे. बुद्धाचा धर्म हा राजा, श्रेष्ठी यांना पोषक आहे आणि बुद्धाच्या वासनानिर्मूलन या सिद्धांतामुळे दुष्ट शक्तीं-बरोबर झुंजण्याची माणसाची जिद्दच खलास होते व माणूस दुर्बल, प्रतिकार-शून्य होतो. मार्क्सवाद याच्या उलट असल्यामुळे बुद्धधर्म व मार्क्सवाद यांच्यात तुलना शक्य नाही अशी भूमिका रामविलास शर्मा घेतात. गोविंदचंद पांडचे यांची भूमिका मात्र कोणतेही दर्शन जवळ करण्याची दिसत नाही. त्यांच्यामते मार्क्स व बुद्ध यांनी जरी एकाच समस्येचा विचार केलेला असला तरी दुःखाचे स्वरूप, कारण आणि दुःख निवारणाचे उपाय याविषयीच्या त्या दोघांच्या दृष्टि-कोनांमध्ये केवळ भेदच नाहीत तर विरोध आहे. मार्क्स व बुद्ध यांच्यातील भेद समजून घेण्याच्या दृष्टीने पांडचे यांचा लेख उपयुक्त आहे.

वर उल्लेखिलेल्या विचावंतांखेरीज जगदीश काश्यप, लुईस मोजिका सॅन्डोझ, डॉ. वर्मा यांचेही लेख या पुस्तकात समाविष्ट केलेले आहेत. परंतु त्यांचे विचार वर आलेल्या मतांपेक्षा खास वेगळे म्हणून उल्लेखनीय नाहीत. याशिवाय के. एन्. जयतिलके यांचाही एक लेख आहे. परंतु त्याचा ‘ बुद्धदर्शन और मार्क्सवाद ’ या पुस्तकात कोणत्या कारणासाठी समावेश केलेला आहे हा एक प्रश्नच आहे. कारण या लेखात बौद्धांची ‘ रूप ’ ( Matter च्या जव-ळची कल्पना ) स्पष्ट केलेली असून त्यासंबंधी बौद्धांचे विवेचन कसे अत्याधुनिक विज्ञानाशी जुळणारे आहे हे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. हा विषय ग्रंथाच्या प्रस्तुत विषयाशी फारच दूरान्वयाने संबंधित आहे.

बौद्धदर्शन आणि मार्क्सवाद यांच्यात किंवा कोणत्याही दोन विचारधारां-मध्ये तुलना करण्यापूर्वी त्या विचारधारांची ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी

समजावून घेणे अगत्याचे असते. तसेच त्यांची वैचारिक चौकटही नीट समजाऊन घेणे अगत्याचे असते हा गोविंदचंद पांडचे यांनी सुचविलेला विचार महत्त्वाचा आहे. पण हे लक्षात न घेता त्यांच्यात साम्य दाखविण्याची घाई केली तर बऱ्याचदा आपण जे साम्य दाखवितो ते वरवरचे ठरते. अनेक लेखांमध्ये असे वरवरचे साम्य दाखविण्याची घाई झालेली जाणवते. मार्क्स व बुद्ध यांच्या प्रणाली या स्वतंत्र, पूर्ण, organic whole असल्याप्रमाणे आहेत व त्या प्रणालींमध्ये प्रत्येक विचाराला, सिद्धांताला विशिष्ट स्थान, दर्जा आहे. त्यामुळे एखादा सिद्धांत–उदाहरणार्थ अनित्यता, मार्क्स व बुद्ध दोघांनी मांडला आहे. एवढेच म्हणून चालणार नाही तर त्या सिद्धांताचे त्या त्या प्रणालीत असणारे स्थान पहायला हवे. उदा. बौद्ध तत्त्वज्ञानात अनित्यतेचा संबंध दुःखाशी जोडलेला आहे. वस्तुतः जग अनित्य असताना ते नित्य म्हणून पहाणे, तसा व्यवहार करणे यामुळे दुःख होते असे म्हटले आहे. पण मार्क्सवादामध्ये मात्र दुःखाचा संबंध या रीतीने अनित्यतेशी जोडलेला दिसत नाही.

वेगवेगळ्या संकल्पनांचे अर्थ सोयिस्करपणे आपल्या युक्तिवादाशी अनुकूल लावणे हाही प्रकार अनेक लेखांमध्ये झालेला दिसतो. उदा. देवीप्रसाद चट्टोपाध्याय बुद्धाच्या चार आर्यसत्यांपैकी पहिल्या आर्यसत्याचे विवेचन मार्क्सवादी पद्धतीने करतात. ते म्हणतात– 'बुद्धाने प्राचीन वर्गविहीन समाजाकडून किंवा आदिमसाम्यवादी समाजाकडून स्फूर्ती घेतलेली होती. ही स्फूर्ती घेऊन एकतंत्री, अनियंत्रित राजेशाहीमुळे नुकत्याच जन्माला आलेल्या वर्गीय समाजातील दुःखाचे आणि वेदनांचे कारण नव्या वर्गीय समाजातील नवीन नैतिक मूल्ये हे आहे असे गौतम बुद्ध सांगतात.' वस्तुतः बुद्धाने दुःखाचे मूल अज्ञानजनित तृष्णा होय असे स्पष्ट, निःसंदिग्धपणे सांगितलेले आहे. तृष्णा ही माणसाची एक प्रवृत्ती असून ती फक्त विशिष्ट वर्गातच उत्पन्न होते असे नाही तर कोणत्याही काळात कोणत्याही वर्गातील व्यक्तीमध्ये आढळणारी ही प्रवत्ती आहे. त्यामुळे जोपर्यंत माणूस या तृष्णेपासून स्वप्रयत्नाने मुक्त होत नाही तोपर्यंत त्याचे दुःख मग तो आदिमसाम्यवादी समाजातील माणूस असो वा वर्गविहीन समाजातील माणूस असो, असणारच. बौद्धांच्या अनीश्वरवादाबद्दल चट्टोपाध्याय काय म्हणतात तेही पहाण्याजोगे आहे. त्यांच्या मते टोळी समाजात सामाजिक अन्यायामुळे निर्माण होणाऱ्या दुःखावर पांघरूण घालण्यासाठी लोकांच्या डोक्यात ईश्वर–कल्पना भरवून देण्याची आवश्यकता नसते. त्यामुळे टोळीसमाजात ईश्वर कल्पना दिसत नाही. आणि बुद्धापुढे टोळीसमाजाचा आदर्श असल्याने बौद्ध–

धर्मात ईश्वरकल्पना दिसत नाही. एकतर हा युक्तिवाद करताना चट्टोपाध्याय हे विसरतात की याच लेखात ( बौद्ध तत्त्वज्ञानाच्या काही प्रारंभिक समस्या ) आपणच बुद्धाने ईश्वराचे अस्तित्व नाकारण्याकरिता केलेले बुद्धिवादी युक्तिवाद दिलेले आहेत. दुसरे असे की ईश्वरकल्पना निसर्गातील वेगवेगळ्या गोष्टींमागील गूढ न उकलल्यामुळे, भीतीपोटी निर्माण झालेली आहे असेही एक मत रूढ आहे. आणि जर आपण बुद्धकालीन परिस्थिती पाहिली तर असे दिसते की बुद्धाच्या पूर्वी अस्तित्वात असलेल्या तथाकथित आदिमसाम्यवादी टोळीसमाजात ईश्वरसंकल्पना चांगलीच रुजलेली होती.

असो. बुद्ध व मार्क्स यांच्या विचारसरणींमध्ये तुलना करण्याचा मोह अनेक भारतीय विचारवंतांना पडत आलेला आहे. किती विविध दृष्टिकोनांतून व पद्धतींनी ही तुलना केली गेली आहे व केली जात आहे याचे एक चित्र आपल्याला या दोन पुस्तकांमधून मिळते. पण त्याचबरोबर अशीही एक अपेक्षा निर्माण होते की अशा पुस्तकांमधून बुद्ध व मार्क्स यांच्या विचारांचे चिकित्सक विवेचन व्हावे व आधुनिक कालातील काही समस्या सोडविण्यासही त्यातून दिशा मिळावी. पं. जगन्नाथ उपाध्याय यांच्यासारख्यांच्या एखाद्या लेखातून याविषयी काही सूचना मिळतात. पण यांबाबतीत वैचारिक स्पष्टता व दोघांच्या सामाजिक तत्त्वज्ञानांची आधुनिक समस्यांच्या सोडवणुकीला उपयुक्त अशी मांडणी या दोन्ही दिशांनी अजून बराच मोठा पल्ला गाठावा लागेल याचीही जाणीव ही पुस्तके वाचल्यावर होते.

तत्त्वज्ञान विभाग
पुणे विद्यापीठ.

हेमलता मोरे

परामर्श

# लेख व लेखक सूची

## खंड ७ : अंक १


१) अजित सरदार : बुद्धवाद, आंबेडकरवाद की मार्क्सवाद ?
२) प्रदीप गोखले : मार्क्स आणि बुद्ध : काही मुद्दे
३) मीना केळकर : प्रा. धर्मानंद कोसंबी व कार्ल मार्क्स
४) के. जे. शहा : शोषणमुक्ती– दोन दृष्टिकोन
५) ल. भा. कुरकुरे : मार्क्स, फुले, गांधी व आंबेडकर (वैचारिक संश्लेषणाची गरज)
६) बा. धो. रामपुरे : विष्णुबावा ब्रह्मचारी आणि कार्ल मार्क्स


## खंड ७ : अंक २


१) सु. वा. बखले : व्यक्तिगत आदर्श आणि सामाजिक संदर्भ
२) र. ग. दांडेकर : भारतीय तत्त्वज्ञान– एक विचार
३) वीणा गजेन्द्रगडकर : आत्मभाव (Personal Identity) आणि कणाद–मुनींची आत्म्याविषयीची मते.
४) शं. रा. तळघट्टी : रामदासांची महंत–संकल्पना
५) ज. र. जोशी : थेरवाद : कर्म आणि पुनर्जन्म


## खंड ७ : अंक ३


१) वसंत पापळकर : वैज्ञानिक उपपत्तीचे स्वरूप व कार्य : साधनवाद
२) उषा गडकरी : विट्गेस्टाइन आणि कुलसाम्य
३) वीणा गजेन्द्रगडकर : आत्मभाव (Personal Identity) आणि कणाद–मुनींची आत्म्याविषयीची मते
४) ज. र. जोशी : थेरवाद : प्रतीत्यसमुत्पाद
५) हेमलता मोरे : प्रतीत्यसमुत्पाद : काही प्रश्न
६) सदानंद मोरे : 'आकाश' : बौद्धांचे आणि वेदांत्याचे

**खंड ७ : अंक ४**


१) अशोक चौसाळकर : एम. एन. रॉय आणि मार्क्स– एक अभ्यास

२) अशोक चौसाळकर : इतिहासाचार्य राजवाडे यांचे सामाजिक व राजकीय विचार– एक मार्क्सवादी अभ्यास

३) सदानंद मोरे : मार्क्स आणि आंबेडकर

४) शरद् पाटील : आंबेडकर आणि मार्क्स : समन्वयप्रवर्तन ... !

५) उषा वाघ : आंबेडकर आणि मार्क्स : एका चर्चासत्राचा वृत्तांत

६) मोहन शिंगटे : आचार्य जावडेकरांचा समन्वयवाद

७) श्रीपाद केळकर : मार्क्स आणि लोहिया

८) दि. मा. खैरकर : मार्क्स आणि बुद्ध


# साभार पोच

१. **आंबेडकर आणि मार्क्स**; रावसाहेब कसबे, सुगावा प्रकाशन, पुणे (१९८५) प्रथमावृत्ती, पृष्ठे चोवीस + ३६०+१२ किंमत रु. ८०.

२. **आनंद कुमारस्वामी – व्यक्ती आणि विचार**; वि. श्री. नरवणे, अनुवाद ग. ना. जोशी, कॉंटिनेंटल प्रकाशन आणि मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळ, पुणे (१९८५), प्रथमावृत्ती, पृष्ठे १२+१५० किंमत रु. २५

३. **बुद्धधम्मातील अनात्मवाद**; वसंत मून, सुगावा प्रकाशन, पुणे (१९८५) प्रथमावृत्ती, पृ. ४२ किंमत रु. १०.

४. **साहित्याचे तत्त्वज्ञान**; वि. ना ढवळे, कॉंटिनेंटल प्रकाशन आणि मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळ, पुणे (१९८४) प्रथमावृत्ती, पृ. ४०४, किंमत रु. ६०.

५. **व्यथाफुली** (काव्यसंग्रह) – सुखदेव ढाकणे, अभिनव प्रकाशन, मुंबई (१९८३), प्रथमावृत्ती.